**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांकः20.10.2024** **वारः रविवार**

---

ठळक बातम्या

- कृत्रिम बुद्धिमत्ता ही भारतासाठी संधी आणि आव्हानही असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन
- महायुती आणि महाविकास आघाडीचं जागावाटप येत्या एक-दोन दिवसांत जाहीर होणार
- वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या पाच पिकांच्या वाणाचा भारताच्या राजपत्रात समावेश
- विजया रहाटकर यांची राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्ती

आणि

- बंगळुरू क्रिकेट कसोटीत न्यूझिलंड समोर विजयासाठी 107 धावांचं लक्ष

**शिक्षण कर्मयोगी सप्ताह**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल नवी दिल्लीतील डॉक्टर आंबेडकर आंतरराष्ट्रीय केंद्रात 'राष्ट्रीय शिक्षण कर्मयोगी सप्ताहाचं उद्घाटन केलं. या  काळात विविध कार्यशाळा आणि परिषदांचं आयोजन केलं जाणार आहे. या सप्ताहादरम्यान प्राप्त होणारं ज्ञान आणि अनुभवांमधून सध्याची कार्यप्रणाली सुधारण्यास मदत होईल आणि 2047 पर्यंत विकसित भारत करण्याचं उद्दिष्ट साकार करण्यामध्ये याचा उपयोग होईल. राष्ट्रीय शिक्षण कर्मयोगी सप्ताहामुळे विविध विभागातील सरकारी कर्मचारी आणि संस्था यांना एक नवीन प्रेरणा मिळेल आणि प्रत्येकजण राष्ट्रीय उद्दिष्टासाठी काम करेल तसंच शिक्षणालाही यामुळं प्रोत्साहन मिळेल असं प्रतिपादन पंतप्रधानानी यावेळी केलं.मागील दहा वर्षांत सरकारची मानसिकता बदलण्यासाठी केलेल्या प्रयत्नांवरही मोदी यांनी यावेळी भाष्य केलं. जग कृत्रिम बुद्धिमत्तेकडं संधी या दृष्टीनं पाहत असलं तरी भारतासाठी ते आव्हान आणि संधी दोन्हीही आहे असंही त्यांनी अधोरेखित केलं. भविष्यातील भारताच्या प्रगतीसाठी आपण कृत्रिम बुद्धिमत्तेचा यशस्वीपणे वापर केला तर परिवर्तनात्मक बदल घडवून आणता येतील असं ते म्हणाले.

**महायुती बैठक**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, राज्यात महायुती आणि महाविकास आघाडीच्या मोर्चेबांधणीला वेग आला आहे. महायुतीच्या वरिष्ठ नेत्यांची काल गृहमंत्री अमित शाह यांच्याबरोबर नवी दिल्लीत बैठक झाली. या बैठकीला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि ऊपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. एक-दोन

दिवसात जागा वाटप जाहीर होईल अशी माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वार्ताहरांशी बोलताना दिली.

**काँग्रेस बैठक**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुंबईतील  टिळक भवन काँग्रेसच्या वरिष्ठ निरिक्षकांच्या बैठक झाली. या बैठकीला महाराष्ट्राचे प्रभारी रमेश चेन्नीथला, राजस्थानचे माजी मुख्यमंत्री अशोक गहेलोत, छत्तीसगडचे माजी मुख्यमंत्री भूपेश बघेल, पंजाबचे माजी मुख्यमंत्री चरणजित सिंग चन्नी, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्यासह अनेक प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

**महाविकास**

महाविकास आघाडीमध्ये कोणतेही मतभेद नाहीत. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख यांची   ठीक नव्हती. म्हणून त्यांच्या तब्बेतीची विचारपूस करण्यासाठी आपण त्यांच्या निवासस्थानी आलो होतो, अशी माहिती काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी काल  पत्रकारांशी बोलताना दिली.

**अखिलेश**

समाजवादी पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार अखिलेश यादव यांनी काल धुळे शहर विधानसभा मतदारसंघात समाजवादी पार्टीच्या वतीनं उमेदवारी जाहिर करण्यात आलेले इर्शाद जहागिरदार यांच्या प्रचारार्थ पहिली सभा घेतली. महाविकास आघाडी ही इंडिया युतीचाच एक भाग आहे. त्यामुळं धुळे आणि मालेगावसह 12 जागांची मागणी समाजवादी पार्टीनं महाविकास आघाडीकडं केली असल्याचं त्यांनी नंतर बातमीदारांना सांगितलं.

**सुळे**

शरदचंद्र पवार राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेबद्दल चिंता व्यक्त केली आहे. मुंबईत पत्रकारांशी बोलताना सुळे यांनी सरकारच्या आर्थिक कारभारावर टीका केली. राज्य आर्थिक संकटात असून सरकारनं मोठ्या प्रमाणावर कर्जं घेतली आहेत आणि काही महिन्यांत कदाचित सरकार पगार देऊ शकणार नाही असं सुळे यावेळी म्हणाल्या. करदात्यांचे पैसे जाहिराती आणि सरकारी कार्यक्रमांवर खर्च होत आहेत याकडेही त्यांनी लक्ष वेधलं.

**निवडणूक**

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीतील मतदानाची टक्केवारी मागच्यापेक्षा वाढण्यासाठी स्वीप पथकातील अधिकारी कर्मचारी यांनी जनजागृतीचं काम करावं, यासाठी आवश्यक नियोजन करून स्वीप मोहीम गतीनं राबविण्यात यावी अशा सूचना कोल्हापूरचे जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी काल सर्व अधिकाऱ्यांच्या आढावा बैठकीत दिल्या.

**नांदेड-निवडणूक**

नांदेड जिल्ह्यात आचारसंहितेच्या काळात पैशाची देवाण-घेवाण, भेट वस्तु वाटप, रोख रक्कम, अंमली पदार्थ, दारु विक्री आणि वाहतूक अशा घटनावर नियंत्रण ठेवता यावं यादृष्टीनं नियुक्त पथकांनी अधिकाधिक कारवाई करुन

कायदा सुव्यवस्था राखण्यावर भर द्यावा, असे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अभिजीत राऊत यांनी दिले.

**राजपत्र**

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या पाच पिकांच्या वाणाचा समावेश भारताच्या राजपत्रात करण्यात आला आहे. याबाबत 8 ऑक्टोबरला कृषि आणि शेतकरी कल्याण मंत्रालयानं अधिसूचना प्रकाशित केली आहे. यामुळं या वाणांचा प्रचार आणि प्रसार मोठया प्रमाणावर होण्यास मदत होईल असं विद्यापीठाचे कुलगुरू डॉक्टर इन्द्र मणि यांनी सांगितलं. हे वाण विकसित करण्यात योगदान देणाऱ्या सर्व शास्त्रज्ञांचं कुलगुरूंनी अभिनंदन केलं.

**रहाटकर-नियुक्ती**

भाजपच्या राष्ट्रीय सचिव, राजस्थान भाजपच्या सहप्रभारी विजया रहाटकर यांची राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्ती झाली आहे. विजया रहाटकर यांनी महाराष्ट्र महिला आयोगाच्या अध्यक्षा म्हणूनही आपला ठसा उमटविला होता. राष्ट्रीय महिला आयोगाचे अध्यक्षपद भूषविणाऱ्या त्या पहिल्या मराठी व्यक्ती ठरल्या आहेत. त्यांना केंद्रीय राज्यमंत्री पदाचा दर्जा असेल. राष्ट्रीय महिला आयोगासारख्या संवैधानिक संस्थेच्या अध्यक्षपदी नियुक्ती केल्याबद्दल त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानले आहेत. हे काम केवळ महिला सक्षमीकरण एवढ्यापुरतंच मर्यादित न राहता, महिलांच्या नेतृत्वाखाली विकासयात्रेला चालना देण्याचा आपला प्रयत्न राहील असं रहाटकर यांनी म्हटलं आहे.

**ऊस-गाळप**

लोकनेता गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाचा गाळप हंगाम 2021-22 मधील देय असलेल्या, प्रति टन चार रूपयांपैकी, प्रतिटन तीन रुपयांचा भरणा केल्याशिवाय, संबंधित साखर कारखान्यांना, यंदाचा हंगाम 2024-25 साठीचा ऊसगाळप परवाना देण्यात येणार नाही, अशा सूचना साखर आयुक्त कुणाल खेमनार यांनी सर्व साखर कारखान्यांना दिलेल्या आहेत. राज्यातील ऊसतोड कामगारांना विविध कल्याणकारी आणि सामजिक सुरक्षा योजनांचा लाभ मिळवून देण्याकरिता ही योजना राबविण्यात येते.

**दीक्षांत**

कॉर्पोरेट जगात पाऊल ठेवताना स्वतःला सिद्ध करा आणि आपल्या गुणांच्या आधारे कुटुंब तसंच संस्थेची प्रतिष्ठा वाढविण्याचं कार्य करा असं आवाहन केंद्रीय सांस्कृतिक आणि पर्यटन मंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांनी काल पुण्यात विद्यार्थ्यांना केलं. एमआयटी विश्वशांती विद्यापीठाच्या दीक्षांत सोहोळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. विज्ञान क्षेत्रात आयुष्यभर केलेल्या अतुलनीय कार्याबद्दल प्रधान वैज्ञानिक सल्लागार डॉक्टर कृष्णस्वामी विजय राघवन यांना "एमआयटी विज्ञान महर्षी सन्मान" देऊन याप्रसंगी गौरविण्यात आलं. सन्मानपत्र, सरस्वतीची मुर्ती आणि रोख 5 लक्ष रूपये असं या पुरस्काराचं स्वरूप आहे. यावेळी विद्यापीठाच्या साडेपाच हजार विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र देण्यात आलं.

**महिला-T20-पुल**

महिलांच्या T20 क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज दुबई इथं न्यूझीलंड आणि दक्षिण आफ्रिका विजेतेपदासाठी लढणार आहेत. 2016 नंतर प्रथमच या स्पर्धेचा नवीन विजेता असेल.

**क्रिकेट**

बंगळुरु इथं न्यूझीलंडविरुद्ध क्रिकेट कसोटीच्या कालच्या चौथ्या दिवशी भारतानं दुसऱ्या डावात 462 धावा केल्या. सरफराज खानची शतकी खेळी आणि ऋषभ पंतच्या केवळ एका धावेनं हुकलेल्या 99 धावांच्या जोरावर भारताला ही धावसंख्या उभारता आली. त्याआधी न्यूझीलंडनं 402 धावा केल्या होत्या. भारतानं न्यूझीलंडसमोर विजयासाठी 107 धावांचं आव्हान ठेवलं आहे.

**पाऊस**

रत्नागिरी जिल्ह्याला पावसानं चांगलंच झोडपून काढलं असून, एक जूनपासून आतापर्यंत झालेला पाऊस जिल्ह्याच्या वार्षिक सरासरीच्या 129 टक्के एवढा आहे. राजापूर, संगमेश्वर, दापोलीसह जिल्ह्याच्या अनेक भागांमध्ये भातपिकांचं नुकसान झालं असून, कृषी विभागाकडून पंचनामे सुरू आहेत.

खडकपूर्णा धरणातून विसर्ग सुरू झाल्यानं, परभणी जिल्हयामधील जिंतूर तालुक्यातील येलदरी धरणाचे दहा दरवाजे काल उघडण्यात आले.  नदीकाठच्या गावांना सतर्क राहण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

बीड जिल्ह्यातील चऱ्हाटा या गावात काल दुपारी ढगफुटी सदृश्य पाऊस झाला आणि गारपिटीनं पिकांचं नुकसान झालं.

नाशिक शहरासह जिल्ह्यात काल मुसळधार पावसानं हाहाःकार उडाला. चांदवड तालुक्यातील राहुड बंधारा भरुन वाहिल्यानं परिसरातील तीन ते चार गावांना धोका निर्माण झाला त्यामुळं तिथल्या कुटुंबांना तातडीनं अन्यत्र हलवण्यात आलं आहे.

**हवामान**

कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी वीजा आणि जोराच्या वाऱ्यांसह हलका ते मध्यम पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**